दावा दाखल तारीख : ०७/०७/२०२०
दावा नोंद दिनांक : ०७/०७/२०२०
निकाल दिनांक : २५/०७/२०२२
कालावधी वर्ष:०२ महिने:०० दिवस:१८

JUDGE CO-OPERATIVE COURT NO. 2 SANGLI

## न्यायाधीश,सहकार न्यायालय क्र.२ सांगली यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी एस.एस.पोरे)

सहकारी वाद क्र.९६/२०२०
निशाणी क्र.३३

नागेश बाळु शिंगे,
वय - ७० वर्षे, व्यवसाय - सुखवास्तू व शेती, **वादी**
रा. वसंतनगर, सांगली, ता. मिरज, जि. सांगली.

**विरुध्द**

१) भारत सहकारी भाडेकरु मालकी गृहनिर्माण संस्था मर्यादित,
कुपवाड, ता. मिरज, जि. सांगली, ता.मिरज, जि. सांगली. **प्रतिवादी**
समन्स अवसायक यांचेवर बजावण्यात यावे.

वादीतर्फे : ॲड.एस.एन.नानवाणी
जाबदेणार क्र.१ तर्फे : ॲड.टी.यु.कोरे

25/7/22

# <u>न्यायनिर्णय</u>

(दिनांक २५/०७/२०२२)

प्रस्तुत वाद कायम मनाईचा, कामय ताकीदीचा व ज्ञापनाचा आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, जाबदेणार संस्था ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतूदीप्रमाणे नोंद सहकारी गृहनिर्माण संस्था आहे. वादी हा तिचा सभासद आहे. जिल्हा तुकडी सांगली तालुका व पोटतुकडी मिरज पैकी कुपवाड हद्दीतील कुपवाड येथील सर्व्हे नंबर ४२०/अ/२/५ (नवीन नंबर १४०/अ२/५) या मधील प्लॉट नंबर ७८, एकूण क्षेत्र ३००० चौ.फु. चा प्लॉट यासी चतु:सिमा खालीलप्रमाणे:-

पुर्वेस : रस्ता

दक्षिणेस : प्लॉट नंबर ७७

पश्चिमेस : लगताचा प्लॉट

उत्तरेस : प्लॉट नंबर ७९

आणि

जिल्हा तुकडी सांगली तालुका व पोटतुकडी मिरज पैकी कुपवाड हद्दीतील कुपवाड येथील सर्व्हे नंबर ४०७/४ (नवीन नंबर १२७/४) याचे क्षेत्र ०.४२ हे.आर. असून त्यामधील प्लॉट क्र.१३, क्षेत्र ८ आर. यासी चतु:सिमा खालीलप्रमाणे:-

पुर्वेस : समाधान जाबीर यांचा प्लॉट

दक्षिणेस : रस्ता

पश्चिमेस : प्लॉट नंबर १३२ ची मिळकत

उत्तरेस : लगत स.नं.ची मिळकत

25/7/22

३. वर नमूद भूखंड क्र.१३ व ७८ हे वादीने जाबदेणार संस्थेकडून खरेदीपत्राने खरेदी केलेले असून खरेदीपत्राचे दिवशीच जाबदेणार संस्थेच्या वतीने वादीचे कब्जात देणेत आले आहेत. सन १९९६ पासून दोन्हीही भूखंड वादीच्या कब्जात असून रेकॉर्ड ऑफ राईटसमध्ये मालक म्हणून वादीचे नाव नोंद झालेले आहे. जाबदेणार संस्थेने वादीच्या हक्काबाबत कोणत्याही प्रकारे कसलीही हरकत घेतली नव्हती. मात्र जाबदेणार संस्थेच्या अवसायकांनी दि.२६/०४/२०२० रोजी वादीस पत्र देऊन दोन्हीही भूखंड ताब्यात देणेबाबत पत्र दिले. वादीने त्याचे वकीलांचे वतीने अवसायकास दि.२०/०५/२०२० रोजी नोटीस देऊन कोणतीही बेकायदेशीर कृत्य करु नये असे कळविले. मात्र त्यानंतर अवसायकांनी वादीकडे येऊन कारवाई करणार असे सांगितले. मिळकतींचे दर वाढल्याने आर्थिक लाभ मिळविणेचे हेतूने सदर भूखंड बेकायदेशीरपणे हस्तांतरीत करणार असलेचे वादीस समजून आले. सबब वादी हा भूखंडाचा मालक असलेचे जाहीर होऊन मिळणेकरिता आणि जाबदेणार अथवा तर्फे इसमाने सदर भूखंड वादीकडून तबदील करणेबाबत अथवा ताब्यात घेणेबाबत कायमची मनाई होणेकरिता प्रस्तुत वाद दाखल करणेत आला आहे.

४. जाबदेणार संस्थेचे अवसायकम याकामी हजर होऊन देखील त्यांनी कैफियत दाखल केली नाही. सबब प्रस्तुत वादाचे कामकाज त्यांचे कैफियतीविना चालण्याचा आदेश न्यायालयाने दि.१६/०२/२०२१ रोजी केला आहे.

५. प्रस्तुत कामी माझ्या विचाराधीन मुद्दे व त्यांवरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे :

Sd/-
25/7/22

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | मागणीप्रमाणे जाहिरीकरण आणि निरंतरची मनाई मिळणेस वादी पात्र आहे काय? | होकारार्थी |
| २. | अंतिम आदेश व निवाडा काय? | वाद अंशतः मंजूर |

JUDGE CO-OPERATIVE COURT NO.II ★ SANGLI ★

## कारणमिमांसा

**विचाराधीन मुद्दा क्र. १ करिता : -**

६. वादीने त्याचा सरतपास नि.३१ येथे नोंदविला आहे. अवसायकाविरुध्द वाद दाखल करणेस परवानगी देणारे उपबिंधकांचे पत्र नि.३२, जिल्हा तुकडी सांगली तालुका व पोटतुकडी मिरज पैकी कुपवाड हद्दीतील कुपवाड येथील सर्व्हे नंबर ४२०/अ/२/५ चे मूळ खरेदीपत्र नि.३६, जिल्हा तुकडी सांगली तालुका व पोटतुकडी मिरज पैकी कुपवाड हद्दीतील कुपवाड येथील सर्व्हे नंबर ४०७/४ चे मूळ खरेदीपत्र नि.३७, गट क्र.१२७/४, गट क्र.१२७/४ चा ७/१२ चा उतारा नि.३८ आणि गट क्र.१४०/अ/२/५ चा ७/१२ चा उतारा नि.३९, जाबदेणार संस्थेच्या अवसायकांनी वादीस पाठविलेली नोटीस नि.३३ आणि अवसायकांना वादीने वकीलांमार्फत पाठविलेल्या नोटीसची स्थळप्रत नि.३४, अशी कागदपत्रे वादीने दाखल केली आहेत. जाबदेणार क्र.१ तर्फे वादीच्या सदर साक्षीदाराचा उलटतपास घेणेत आला नाही, तसेच जाबदेणार संस्थेतर्फे न्यायालयासमोर शपथेवरील पुरावा देणेत आला नाही.

७. वादीच्या तोंडी तसेच कागदोपत्री पुराव्यास जाबदेणाराने कोणतीही हरकत उपस्थित केली नसलेने सदर पुरावा वाचता येतो. नि.३६ व ३७ ही दोनही खरेदीपत्र नोंदणीकृत आहेत. दोन्ही खरेदीपत्रांवर जाबदेणार संस्थेतर्फे अध्यक्षांचा सही व शिक्का आहे. जिल्हा तुकडी सांगली तालुका व पोटतुकडी मिरज पैकी कुपवाड हद्दीतील कुपवाड

25/7/22

येथील सर्व्हे नंबर ४२०/अ/२/५ मधील प्लॉट नंबर ७८ हा भूखंड  वादीने जाबदेणार संस्थेकडून खरेदी केलेचे नि.३६ हया मूळ खरेदीपत्रावरुन स्पष्ट होते. तसेच  जिल्हा तुकडी सांगली तालुका व पोटतुकडी मिरज पैकी कुपवाड हद्दीतील कुपवाड येथील सर्व्हे नंबर ४०७/४ मधील प्लॉट क्र.१३ हा भूखंड  वादीने जाबदेणार संस्थेकडून खरेदी केलेचे नि.३७ हया मूळ खरेदीपत्रावरुन स्पष्ट होते. परिणामी सदर दोन्ही भूखंड वादीने जाबदेणार संस्थेकडून खरेदी केल्याचे स्पष्ट होते.

८. नि.३८ व ३९ म्हणजेच अनुक्रमे सर्व्हे नंबर ४२०/अ/२/५ (नवीन नंबर १४०/अ२/५) आणि सर्व्हे नंबर ४०७/४ (नवीन नंबर १२७/४) या दोनही भूखंडांच्या ७/१२ उताऱ्यामध्ये वादीचे नाव नमूद दिसते.

९. जाबदेणार संस्थेच्या अवसायकांनी वादीस पाठविलेल्या नि.३३ नोटीसचे अवलोकन करता त्यात असे नमूद दिसते की, भूखंडांच्या मालकी हक्काच्या पुष्ट्यर्थ वादीने कोणतीही कागदपत्रे संस्थेकडे सादर केली नाहीत, अवसायकावर अशा कागदपत्राची खातरजमा करण्याची जबाबदारी असताना वादीने सहकार्य केले नाही, सबब वादीकडून भूखंडांचा कब्जा मागितला गेला.

१०. वादातील दोनही भूखंडांची वादीची मालकी दर्शविणारी मूळ कागदपत्रे वादीने याकामी हजर केलेने आणि त्याबाबत जाबदेणारतर्फे कोणताही आक्षेप नोंदविण्यात न आलेने वादी हा वादातील भूखंडांचा मालक असलेचे स्पष्ट होते. अशा परिस्थितीत वादीचे भूखंड ताब्यात घेण्याचा अगर अन्य व्यक्तीस तबदील करणेचा अधिकार जाबदेणार संस्थेस अगर तर्फे इसमास नाही.

अशा परिस्थितीत विचाराधीन मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी येतो.

उपरोक्त विवेचनावरुन मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

25/7/22

# आदेश

१. प्रस्तुत वाद खर्चासह मंजूर करणेत येत आहे.

२. याद्वारे असे जाहीर करणेत येते की, जिल्हा तुकडी सांगली तालुका व पोटतुकडी मिरज पैकी कुपवाड हद्दीतील कुपवाड येथील सर्व्हे नंबर ४२०/अ/२/५ (नवीन नंबर १४०/अ२/५) या मधील प्लॉट नंबर ७८ आणि जिल्हा तुकडी सांगली तालुका व पोटतुकडी मिरज पैकी कुपवाड हद्दीतील कुपवाड येथील सर्व्हे नंबर ४०७/४ (नवीन नंबर १२७/४) मधील प्लॉट क्र.१३, हे भूखंड वादीच्या मालकीचे आहेत.

३. जाबदेणार संस्थेने अगर तिच्यातर्फे इसमाने सदर भूखंड वादीकडून ताब्यात घेणेस अथवा तबदील करणेस याद्वारे निरंतरची मनाई करणेत येत आहे.

४. येणेप्रमाणे हुकूमनामा करणेत यावा.

JUDGE CO-OPERATIVE COURT NO. II
SANGLI

25/7/22

सांगली.
दिनांक: २५/०७/२०२२

(एस.एस.पोरे)
न्यायाधीश
सहकार न्यायालय क्र.२,सांगली

## न्यायाधीश,सहकार न्यायालय क्र.२ सांगली यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी एस.एस.पोरे)

सहकारी वाद क्र.९६/२०२०

निशाणी क्र.३४

JUDGE CO-OPERATIVE COURT No.II SANGLI

नागेश बाळु शिंगे,
वय - ७० वर्षे, व्यवसाय - सुखवास्तू व शेती, **वादी**
रा. वसंतनगर, सांगली, ता. मिरज, जि. सांगली.

**विरुध्द**

१) भारत सहकारी भाडेकरु मालकी गृहनिर्माण संस्था मर्यादित,
कुपवाड, ता. मिरज, जि. सांगली, ता.मिरज, जि. सांगली. **प्रतिवादी**
समन्स अवसायक यांचेवर बजावण्यात यावे.

वादीतर्फे : ॲड.एस.एन.नानवाणी
जाबदेणार क्र.१ तर्फे : ॲड.टी.यु.कोरे

## हुकुमनामा

दिनांक ०७/०७/२०२० रोजी दाखल केलेल्या वरील वादाचा दि.२५/०७/२०२२ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम,१९६०, चे कलम ९६ अन्वये दिलेल्या निकालाप्रमाणे प्रस्तुत वाद खालीलप्रमाणे निकाली करणेत येत आहे.

१. प्रस्तुत वाद खर्चासह मंजूर करणेत येत आहे.

२. याद्वारे असे जाहीर करणेत येते की, जिल्हा तुकडी सांगली तालुका व पोटतुकडी मिरज पैकी कुपवाड हद्दीतील कुपवाड येथील सर्व्हे नंबर ४२०/अ/२/५ (नवीन नंबर १४०/अ२/५) या मधील प्लॉट नंबर ७८ आणि जिल्हा तुकडी सांगली तालुका व पोटतुकडी मिरज पैकी कुपवाड हद्दीतील कुपवाड येथील सर्व्हे नंबर



25/7/22

४०७/४ (नवीन नंबर १२७/४) मधील प्लॉट क्र.१३, हे भूखंड वादीच्या मालकीचे आहेत.

३. जाबदेणार संस्थेने अगर तिच्यातर्फे इसमाने सदर भूखंड वादीकडून ताब्यात घेणेस अथवा तबदील करणेस याद्वारे निरंतरची मनाई करणेत येत आहे.

४. शिवाय प्रतिवादींनी तपशिलप्रमाणे दावा खर्चाची रक्कम रुपये १०,३५५/- वादीला दयावी व स्वतःचा खर्च स्वतः सोसावा.

| अ.क्र. | खर्चाचा तपशिल | वादी | प्रतिवादी |
|---|---|---|---|
| १ | कोर्ट फी स्टॅम्प | ५,०१०/- | -- |
| २ | चलन फी | ३१०/- | -- |
| ३ | वकील फी | ५,०००/- | ५,०००/- |
| ४ | सेवा शुल्क | ३५/- | -- |
| | **एकूण रुपये** | १०,३५५/- | ५,०००/- |

(एकूण अक्षरी रुपये दहा हजार तीनशे पंच्चावण्ण मात्र)

आज दि.२५/०७/२०२२ रोजी हा निवाडा माझे सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला आहे.

JUDGE CO-OPERATIVE COURT No.II SANGLI

सांगली.
दिनांक: २५/०७/२०२२

25/7/22
(एस.एस.पोरे)
न्यायाधीश
सहकार न्यायालय क्र.२,सांगली